ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाय



प्रा.डॉ. देवकाते बी. एन.
इतिहास विभाग, *एस एम जोशी कॉलेज, हडपसर , पुणे*

प्रस्तावना -

शेतकरी या शब्दाचा शब्दश : अर्थ पहिला असता शेतकरी म्हणजे जमिनीत , शेतात कष्ट करून घाम गाळणारा उत्पादक घटक ज्याच्यावर बहुसंख्य जनता अवलंबुन असते असा तो शेतकरी.

शेतकरी म्हटले की त्याच्या शेतावर जमिनीची मालकी हक्क असणे , खंडाचा हक्क असणे , भाडेपट्ट्याचा हक्क असणे किंवा दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करणे असा अर्थ घेता येईल.

शेतात प्रत्यक्ष जमीन कसण्याचे काम करतो तो शेतकरी स्वतःच्या मालकीचे किंवादुसऱ्याच्या शेतात कुटुंबासहित कष्ट करणारा शेतकरी वर्ग भारतात प्राचीन काळापासून जीवन व्यथित करत आहे . ग्रामजीवनात शेतकऱ्यांचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे . कृषिप्रधान व्यवस्थेतील स्थान ७० टक्के आहे . या शेतकरी वर्गाचे शेती विषयक प्रश्न पूर्वी कोणत्याही व्यासपीठावर मांडले जात नव्हते . कारण हे प्रश्न स्वतः शेतकरी आपल्या पद्धतीने सोडविण्याचे प्रयत्न करीत होते. हा वर्ग संघटित नव्हता . संघर्षऐवजी समन्वयवादी भूमिका शेतकऱ्याची होती . विसाव्या शतकात मात्र संघटनेतुन चळवळीची संघर्षाची वाटचाल सुरु झाली पण बऱ्याच वेळा हे प्रश्न सोडवीत असताना त्यांची स्थिती बिकट झाल्यानेच विविध कालखंडात त्यांचे प्रश्न जगासमोर मांडण्यासाठी चळवळीचा आधार घ्यावा लागला .

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जोपर्यंत हा वर्ग एकत्र येत नाही त्यांच्यात संघटना निर्माण होत नाही तोपर्यंत त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत म्हणूनच शेतकरी संघटनेच्यामार्फत महाराष्ट्रातच काय पण भारतात विविध ठिकाणी शेतकरी आंदोलने घडवून आणली .

माओत्से तुंग आणि चेआनोव्ह यांनी शेतकरी या शब्दाची व्याख्या देताना अभिप्रेत असलेल्या समाज व्यवस्थेला धरून केली आहे . त्यांनी केवळ शेतात राबणारे शेतकरी अपेक्षित नाहीत तर अन्यायाविरुद्ध झगडणारा व बदल घडवून आणणारा समाजातील प्रभावी घटक म्हणून ते शेतकऱ्यांकडे पाहतात . भारतीय इतिहासामध्ये पहिल्यांदाच प्रो आर .एस . शर्मा व प्रो डी.डी कोसम्बी यांनी शेतक-यांना स्थान प्राप्त करून दिले आहे . प्रो डॅनियल थॉर्मर यांनी भारतीय शेतकऱ्यांचे सर्व प्रथम चित्रण करण्याचा प्रयत्न केला तसेच प्रो इरफान हबीब यांच्या मते, जी व्यक्ती स्वतःच्या हिंमतीवर शेती कसण्याचे काम स्वीकारते व त्यासाठी स्वतःची अवजारे या कामात त्याला त्यांच्या घरच्या लोकांचे श्रम उपयोगी पडतात तो शेतकरी होय . प्रो हबीब यांच्या मते शेतकऱ्यांच्या या वर्गवारीमध्ये शेतकऱ्यांच्या मालमत्ते संबंधीचे नातेही लक्षात घेणे आवश्यक आहे . या वर्गवारी मध्ये मालकी असणारा शेतकरी (Peasant Propriefor ) जमिनीचा तावा किती काळापर्यंत असतो.या संबधी त्याला हक्क आहे (Occupancy Right) अशा शेतात निघणाऱ्या उत्पादनांमध्ये कराचा वाटा 25 टक्के , 50 टक्के , इ वर्गवारीचा विचार करावा लागतो. या शिवाय शेतकरी वर्गाची वर्गवारी त्यांची संपत्ती **(wealth )** मालकीखाली असणारे व महागडी उत्पादनाची साधने, चांगल्या प्रकारची

शेतीयुक्त जनावरे असणारे शेतकरी व जादा सुपीक जमीन पिकविणारे शेतकरी अशा प्रकारे करता येईल . या संदर्भात भूमिहीन शेतमजुराला शेतकरी वर्गात समाविष्ट्र करता येणार नाही .हिंदुस्थान म्हणजे खेडी हे ध्यानी घ्यावे खेडी म्हणजे शेतकरी आणि शेतकरी म्हणजे हिंदुस्थान . शेतकऱ्याविषयीच्या खऱ्या खुऱ्या अर्थाने असे म्हणता येईल कि तो म्हणजेच हिंदुस्थान होय. **Of him it may with truth be said that he is India Said that he is india .** लॉर्ड लीनलीथगो १९२८ साली शेतीचा अभ्यासकरण्यासाठी इंग्रज सरकारने एक रॉयल कमिशन नेमले. त्याचे अध्यक्ष लॉर्ड.लीनलीथगो होते. त्यांनी शेतकऱ्यांबद्दल काढलेले उद्गार चाळीस वर्षानंतर मार्मिक वाटतात यात शंका नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे झुंजार नेते दिनकरराव जवळकर यांनी वर्णन करताना म्हटले आहे की हिंदुस्थान म्हणजे शेतकरी आणि शेतकरी म्हणजे हिंदुस्थान असे समीकरण तयार झाले . त्यातून शेतकरी वजा केला बाकी शून्य असेल.

स्वातंत्र्यपूर्ण काळात शेतकऱ्यांचे भारतात अनेक लहान मोठे उठाव झाले परंतु या उठावास दिशा नसल्याने तत्कालीन ब्रिटिश अधिकारी उठाव दडपून टाकत असत. प्रांताप्रांतातील शेतकऱ्यांचे वेगवेगळे प्रश्न असल्याने राष्ट्रीय पातळीवर संघटना निर्माण करण्यात अडचण येत असत .

ग्रामीण भागात शेतकरी चळवळीला बळ आले. गुजरात,बिहार,आंध्रप्रदेश,महाराष्ट्र इ.प्रांतात उठाव घडून आले. ब्रिटिश राजवटीच्या काळात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याकडून कर वसूल केला जाई.या चळवळीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत गेली. ब्रिटिश राजवट स्थिर झाल्यावर कृषकप्रधान व्यवस्थेत बदल झाला तो म्हणजे सक्तीची रोख स्वरूपात सारा वसुली राज्यकर्त्यांना याची जाण असल्याने शेतकऱ्याला हा अनाठायी वाटत आदिवासी, कष्टकरी, उपेक्षित, वंचित वर्गाला न्याय हक्क मिळवून देण्याचे काम केले.

मराठेशाहीच्या काळात पुणे प्रांतात रामोशांची संख्या खूप होती, शेती करणे, पशुपालन करणे,किल्यांचा बंदोबस्त करणे, राजवाड्यावर पहारेक-याची कामे करणे इत्यादी कामे त्यांना करावी लागत असत.सर्वच रामोशी दरोडेखोर नव्हते. गावचा महसूल गोळा करण्याचा अधिकार त्यांना असत पण यावर गदा आल्याने संघर्षाला तोंड फुटले . पुरंदर तालुक्यातील भिवडी या गावी उमाजी नाईकचा १७९१ रोजी जन्म झाला. त्याचे वडील दादोजी प्रख्यात दरोडेखोर होते . १११ दरोडे टाकून लुटालूट केली होती. संतू बेरडच्या नेतृत्वाखाली १८२८-२९ साली भांबुर्डयातील इंग्रजांचा खजिना लुटला होता , संतुच्या निधनानंतर सर्व सूत्रे उमाजीकडे येऊन सात दरोडे, आठ ठिकाणच्या वाटसरूंना लुटले होते. निबांळकर पटवर्धन सरदार सुद्धा त्यांच्या कचाट्यातून सुटले नाहीत त्यांना जेरीस आणले होते.

संथाळ हि आदिवासी जमात सावकाराच्या शोषणाखाली भरडली जात होती. या गरीब आदिवासी जमातीवर अन्याय होत असे. सावकार विरोधचा रोष ते दरोडा टाकून व्यक्त करत होते. तरी पण सावकार शेतकऱ्याची पिळवणूक मोठ्या प्रमाणावर करीत होते . उलट ब्रिटिश सरकार जमीनदार सावकाराची दखल आदिवासी संथाळांना बंदी बनवले त्यामुळे संथाळांमध्ये असंतोष पसरला.

१९व्या शतकात शेतकऱ्यांनी वेगवेगळया ठिकाणी उठाव केले. बंगाल,बिहार, महाराष्ट्र राज्यांतील शेतक-यांनी केलेले उठाव महत्त्वपुर्ण आहेत. बंगालमधील नीळ मळेवाल्या शेतकऱ्यांनी मळेवाल्या जमीनदाराविरुद्ध चळवळ केली होती.त्याकाळात बंगालमधील निळीची लागवड ही युरोपियन जमीनदाराची मक्तेदारी होती. बहुतेक मळे जमीनदारांचे होते . भारतीय मजुरांना त्यात राबवून घेतले जाई, दीनबंधू मित्र यांनी आपल्या नीलदर्पण या नाटकांमधून मळेवाल्यांचे शेतकऱ्यांवर होणारे अन्याय, अत्याचाराचे प्रभावी चित्रण व हिंदू पेट्रिअट मधून हरिशचंद्र मुखर्जी यांनी उठाव करणाऱ्या शेतकऱ्याचे नेतृत्व केले आहे . १८६६ ते १८६८ या काळात बंगालमधील दरभंगा व चंपारण्य या जिल्ह्यातील नीळ उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनी मळेवाल्या विरुद्ध बंड पुकारले . बंडाची दखल न घेता हे बंड मोडून काढले. १९१७ साली महात्मा गांधीजींनी शेतकऱ्यांची बाजू घेत सत्याग्रहाच्या रूपाने आंदोलन छेडून ब्रिटिश सरकारला धारेवर धरले . चंपारण्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. १९१८ साली गुजरात प्रांतातील खेडा येथील शेतकऱ्यांवर दुष्काळ पडला

होता.कर माफ होण्याऐवजी वाढवला. विठ्ठल पटेल यांनी शेतकऱ्यांना संघटित करत म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली लढा लढवत शेतकर्यांना न्याय मिळवून दिला होता.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांनी शेतकरी वर्गात वैचारिक व सांस्कृतिक क्रांती घडवून आणली .जमीनदार, कुलकर्णी, भट हे शेतकऱ्यांचे कसे शोषण करतात. याचे विदारक चित्रण महात्मा फुले यांनी आपल्या शेतकऱ्यांचा आसूड , गुलामगिरी या ग्रंथांत मांडलेला आहे. दीनबंधू नावाचे मासिक सुरु करून शेतकरी व कामगारांचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जमीनदार,सावकार व ब्रिटिश अधिकाऱ्या विरूद्ध केलेल्या उठावास विशेष महत्व होते. या उठावामागे इंग्रज सरकारचे वसाहत बाबतचे धोरण दिसून येते यातूनच आर्थिक नीतिशासनासाठी कारणीभूत ठरते.

शेतीत घाम गाळणारा शेतकरी हा शिवकाळात आधार होता. शेती हा त्याचा प्रमुख व्यवसाय होता . जमिनीची प्रत, पाणीपुरवठा , मनुष्यबळ , बी बियाणे यांवर शेती अवलंबुन होती. निसर्गाच्या धर्तीवर शेती व्यवसाय चाले. आजच्या सारखे त्याकाळात धरणे नव्हती. रयत सुखी तर राजा सुखी हे शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे मुख्य सूत्र होते. स्वराज्य हे वतनदाराच्या कल्याणासाठी नसून बहुसंख्य रयतेचा कल्याणासाठी आहे अशी त्यांची भावना होती. अनेक इतिहासकारांनी रयतेचा राजा असे संबोधले होते. लहान मोठ्या नद्यांवर छोटी मोठी धरणे बांधून पाटाद्वारे शेतीला पाणी पुरवठा केल्याची नोंद शिवकाळात ॲबे कॅरे या फ्रेंच प्रवाशाने लिहून ठेवले आहे. शिवकाळातील बाजारपेठेला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. कसबी कारागीर आपली बाजारपेठेत वसाहत थाटून पिढ्यान पिढ्या चालत आलेला व्यवसाय करीत असत. खाण्या पिण्याच्या वस्तू, कपडे-चोपडे , नारळ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ इ वस्तूंची विक्री होत. डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचा प्रश्न यावर लेख लिहून हिंदुस्थानातील शेतकरी हा अत्यंत दरिद्री असून त्याची अवस्था शोचनीय आहे , त्याच्यावर कराचे ओझे लादणे योग्य ठरणार नाही असे म्हटले आहे .

## शेतकऱ्यांच्या समस्या :

- **कर्जबाजारीपणा :** भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जात मरतो असे म्हटले जाते. कित्येकदा कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्यास आपल्या जमिनीचा तुकडा विकावा अथवा गहाण ठेवावा लागतो मात्र कावेबाज सावकार शेतकऱ्यास फसवून त्यांच्या जमिनी गिळंकृत करत असत .
- **शेतमाल खरेदी व विक्री पतपुरवठा :** शेतीतून तयार झालेला माल ग्राहकांपर्यंत पोहचेपर्यंत विविध प्रक्रियेतून जात असतो . माल आल्यानंतर साठविणे, निगा राखणे, वाहतूक व्यवस्था करणे,मालाची जाहिरात करणे,बाजारभाव वाढवणे,विक्री करणे यासर्व गोष्टी करताना अडती दलाल यांना महत्व असते .
- **शेतमालाचे बाजारीकरण :** शेतकऱ्यांनी शेतातून अन्यप्रकारची पिके व व्यापारी पीके घेऊन शेतकऱ्यास फायदा होत. उद्योग धंद्याच्या वाढीसाठी कंच्या मालाची गरज लागते . जागतिक बाजारपेठेत चहा , साखर , तेल या पिकांना चांगली मागणी मिळते म्हणुन शेतकऱ्यांचा या पिकावर अधिक भर होता .
- **खुली बाजारपेठ :** एकविसाव्या शतकाला सामोरे जात असताना सहकारी संस्थांनी आपल्या गुणवत्तेकडे अधिक लक्ष द्यावे. आर्थिक कमकुवतपणा येणार नाही यासाठी खुल्या आर्थिक धोरणाचा व सहकार चळवळीचा विचार करावा. आई जेऊ घालीना आणि बाप भीक मागू देईना अशी शेतकऱ्याची अवस्था झाली आहे.
- **शेतकऱ्याचे अज्ञान :** शेती हा पारंपरिक व्यवसाय होता . शेतीमधील घेतलेल्या पिकाचे उपन्न निघेल याची शाश्वती नसत याचे मुख्य कारण म्हणजे शेतीचे मागासलेपण व शेतकऱ्याचे अज्ञान होय.

- **सावकारी व व्यापारी यांच्याकडून होणारे शोषण :** शेती हे शेतकऱ्यांचे उपजीविकेचे महत्वाचे साधन आहे .शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह चालवत असे . सावकाराकडे जमीन गहाण ठेवून कर्जाच्या स्वरूपात पैसे गोळा करीत असे या पैशातून शेतीसाठी लागणारी अवजारे , बी नसल्यामुळे कमी भावात त्याला माल व्यापाऱ्यांना विकावा लागे.तो व्यापारी हाच माल मोठ्या किंमतीत इतर ग्राहकांना विकत असे.बियाणे , खाते , खरेदी करत असे . परंतु बाजारपेठेत मालाला किंमत मिळत नसे.
- **नैसर्गिक आपत्ती :**नैसर्गिक आपत्ती ही शेती उत्पादनातील मोठी समस्या असून .भारतात सुमारे ३/४ एवढी शेती अपुऱ्या व अनिश्चित पावसावर अवलंबून आहे .त्याचप्रमाणे रोगराई , टोळधाड , वादळ , यांचा प्रादुर्भाव शेतमालाच्या उत्पादनावर होत असे .नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण ठेवणे , आवाक्याबाहेरचे असते . उदा . आंबेगाव तालुक्यात अवकाळी पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात गहू , बाजरी , आंब्याच्या मोहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते .
- **मालास रास्त भाव न मिळणे** : शेतकऱ्यांचे आर्थिक जीवन शेतीवर अवलंबून असते. शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळावा यासाठी शेतकरी संघटना चळवळ करते त्याचबरोबर त्याचे दारिद्र्य नष्ट करणे हे चळवळीचे अंतिम उद्दिष्ट असते. एखादा शेतकरी

  बाजारपेठेत आपला माल घेऊन जातो त्याच्या मालास योग्य भाव मिळत नाही, कमी किंमतीत माल विकावा लागतो. **(**संदर्भ ;जोशी शरद **"**प्रचलित अर्थव्यवस्थेवर प्रकाश , शेतकरी प्रकाशन पुणे १९८५ पृष्ठ ०९**)** अशा अनेक समस्याना शेतकर्यांना तोंड द्यावे लागते.

## कृषकप्रधान समाज व्यवस्थेच्या समस्या सोडवण्यासाठी उपाय योजना ;

- **जमिनीच्या प्रतवारी नुसार कमी शेतमालाचे उत्पन्न :** जमिनीची प्रतवारी करून शेतमालाचे उत्पादन घेत असतो. ७१ टक्के पाणी व २९ टक्के जमीन अशी जमीन ची रचना आहे यामध्ये डोंगर द-या , पर्वत , नद्या , जंगल इ साठी बरीचशी जमीन व्यापली गेली आहे. उर्वरित जमीन शेतीसाठी व्यापली जाते . पण तरीही सगळी जमीन शेतीसाठी चांगल्या प्रतीची नाही . पोयटा जमीन, काळी जमीन, मुरमाड जमीन, गाळाची जमीन इ . प्रकार आढळतात .
- **माती परीक्षण / कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शक :** भूतलावर जमीन आणि पाण्याचे विघटन होताना जमीन सर्वत्र सारख्या प्रकारची उपलब्ध नाही म्हणजेच या जमिनीतील माती सर्वत्र सारख्या प्रकारची नाही .तिचे वेगवेगळे प्रकार आहेत ,उदा. काळी माती, तांबडी माती, पोयटा माती इ. या सर्वच मातीत सारखी पिके येतात असे नाही. जमिनीचा पोत पाहून त्यानुसार पिक घेणे.

माती परीक्षण करण्यासाठी शेतात व्ही आकाराचा १.५ सेमी खोल खड्डा घेऊन अर्धा ते पाऊण किलोपर्यंत माती घेऊन तिचे परीक्षण प्रयोगशाळेत केले जाते. 1 ते 15 नागमोडी स्वरूपाचे खडडे घेऊन 1 . 5 ते 2 . 0 सेमी जाडीचा मातीचा काप घेऊन माती परिक्षण केले जाते .

- **शेतमालाच्या निर्यातीत प्राधान्य:** शेतमालाच्यानिर्यातीत गेली काही वर्षे सतत वाढ होत आहे . १९८६ च्या डंकेल प्रस्तावानुसार शेतकऱ्याचा माल बाहेरील देशात पाठविण्यासाठी परवानगी मिळाली . जागतिक बाजारपेठेमध्ये अनेक राष्ट्रांनी खुला अर्थ व्यवस्थेचा स्वीकलर केला तर आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत शेतकऱ्यांच्या शेतमाल निर्यातीत प्राधान्य देण्यात आले . एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणावर सहज माल पाठवता येतो .
- **आधुनिक शेती पद्धतीसाठी प्रयत्न :** भारत देश हा शेतीप्रधान देश आहे या देशातील शेतीचे दर हेकटर उत्पन्न कमी आहे शिवाय बारमाही पाण्याची सोया उपलब्ध नाही त्यामुळे सर्व क्षेत्र ओलिताखाली येत नाही हे क्षेत्र ओलिताखाली आणण्यात आले , पावसाच्या पाण्याचा योग्य वापर करून तळी, बंधारे , निर्माण करावीत , पाण्याच्या उपाय

योजना सोयीसाठी करावा , शेती हिरवीगार करण्यासाठी आधुनिक खते , बी बियाणे व नवीन तंत्राचा वापर करून शेती उत्पन्न वाढवता येईल .

**सारांश -**

शेती हा भारतीय अर्थव्यस्थेचा कणा मानला जातो शेतीवर **70** टक्के लोक अवलंबुन आहे . शेतीमध्ये घाम गाळणारा,कष्ट करणारा तो शेतकरी होय . स्वातंत्र्यपुर्व काळात  शेतकरी सुखी व समाधानी जीवन जगत होता . इंग्रज राजवटीच्या काळात चित्र पालटले . सावकार आणि इंग्रज यांचे संबंध जडले . गावचा महसुल कुलकर्णी. देशपांडे गोळा करत असत . संथाळ शेतकरी व आदीवासी जमातींनी सावकाराच्या विरोधात बंडे पुकारली . त्याच्या हक्कावर गदा आल्याने त्यांनी बंडाचे अस्त्र पुकारले .

दुष्काळ पडला असताना देखील ब्रिटिशांनी शेतक-यासाठी सोयी सुविधा न देता सारा वसुली सक्तीने केली तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शेतक-यांना कर्जमाफी दिली जात नसे . सावकाराकडुन कर्ज घेऊन शेतक-याला कर भरावा लागत असे . यामुळेच आजच्या स्थितीला देखील विशेष करून मराठवाडा,विदर्भात शेतक-यांच्या आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त आहे . पश्चिम महाराष्ट्रात देखील शेतकरी आत्महत्या करू लागले आहेत .

**संदर्भ सूची :**

१) सरदेसाई नलावडे , आधुनिक भारताचा इतिहास
२) एन. डी. पाटील , शेतमालाच्या किफायतशीर किमतीच्या कैफियत १९७० ,
३) प्रीती कोल्हे , महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग के. टी .एच .एम. कॉ. नाशिक **2**मार्च २००७ पृष्ठ-०२
४) एम.व्ही.काळे , इंडियाज स्ट्रगल  फॉर इंडिपेंडन्स
५) शरद जोशी, शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती , शेतकरी प्रकाशन अलिबाग पृष्ठ-३,४
६) अलका झामरे, भारतीय अर्थव्यवस्था
७) शरद जोशी, खुल्या व्यवस्थेचे खुल्या मताने, जनशक्ती चळवळ परभणी,पृष्ठ ७०
८) व व्ही हिंगाडे, छ.शिवाजी राजांचे कल्याण प्रतिनिधी धोरण, इतिहास संशोधन मंडळ ऑक्टो , डिसें.०७ पृष्ठ १४,१५.